# लवकरच रिंगरोडचा मार्ग निश्चित

## पीएमआरडीएकडून पाहणी : अंतिम अहवाल सरकारकडे पाठवणार

पुणे, दि. २२ (प्रतिनिधी) - प्रस्तावित रिंगरोड मार्गाची पाहणी पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) वतीने नुकतीच करण्यात आली. या रस्त्यासाठी किती क्षेत्राचे भूसंपादन करावे लागणार आहे, प्रस्तावित मार्गावर काही बांधकामे आहेत का, अतिक्रमण झाले आहे का? आदींची माहिती यासाठी घेण्यात आली. त्यामुळे लवकरच रिंगरोडचा मार्ग निश्चित केला जाणार आहे.

शहरातील वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी २००७ मध्ये रिंगरोड करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. मागील महिन्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत या मार्गास मान्यता देण्यात आली. त्यामध्ये पुन्हा सर्वेक्षण करून मार्गाची आखणी करावी आणि त्याचा अहवाल सरकारकडे पाठवावा, असे आदेश गडकरी यांनी दिले होते. दरम्यान, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) वतीने प्रस्तावित रस्त्यांचे सर्वेक्षण करण्याचे कंत्राट एका अमेरिकन कंपनीला देण्यात आले होते. या कंपनीकडून प्रस्तावित रिंगरोडचा मार्ग निश्चित करण्यात आला आहे. सदर

**पुढील आठवड्यात लोणीकंद ते पुणे-मुंबई महामार्गाची पाहणी**

कंपनीने केलेला मार्ग अस्तित्वात येणे शक्य आहे का? याची तपासणी करण्याचा निर्णय पीएमआरडीने घेतला होता.

प्रस्तावित रिंगरोड हा आठ पदरी करण्याचे नियोजन आहे. त्याशिवाय दोन्ही बाजूस सर्व्हिस रस्ते असणार आहेत. भविष्यात रस्त्यांचे रुंदीकरण करता यावे, याचा देखील त्यामध्ये विचार करण्यात येणार आहे. रस्त्यासाठी लागणारी जागा कशा पद्धतीने ताब्यात घेता येईल, याचे देखील नियोजन रस्त्यांची आखणी पूर्ण झाल्यानंतर करण्यात येणार आहे. त्यानुसार पीएमआरडीएचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश झगडे यांच्यासह एमएसआरडीसी आणि कंत्राटदार कंपनीचे कर्मचारी यांनी एकत्रितरीत्या प्रस्तावित मार्गाची पाहणी केली.

खेड शिवापूर येथून वडकीनाका, उरळी कांचन-केसनंदपर्यंत प्रस्तावित रस्त्याची पाहणी करण्यात आली. पुढील आठवड्यात लोणीकंद ते पुणे-मुंबई महामार्ग या प्रस्तावित मार्गाची पाहणी करण्यात येणार आहे.

महेश झगडे म्हणाले, प्रस्तावित रस्त्यासाठी किती भूसंपादन करावे लागणार आहे. तसेच या मार्गावर बांधकामे किंवा अतिक्रमण आहे का, रस्ता उंच-सखल आहे का, शहरात येणाऱ्या जाणाऱ्या प्रमुख रस्त्यांना हा कसा जोडता येईल? याची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. पुढील आठवड्यात केसनंदपासून पुणे-मुंबई महामार्गास हा रस्ता कसा जोडणार आहे, याची पाहणी करण्यात येणार आहे. त्यानंतर रस्त्याचा अंतिम प्रस्ताव तयार करण्यात येणार आहे.

# 'रिंगरोड'च्या कामाला गती

## 'पीएमआरडीए'च्या अधिकाऱ्यांकडून पाहणी; अंतिम आखणी लवकरच

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पुणे व पिंपरी-चिंचवडमधील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या १७० किलोमीटर लांबीच्या रिंगरोडची पाहणी पीएमआरडीएच्यावतीने करण्यात आली. रिंगरोडसाठी कराव्या लागणारे भूसंपादन, प्रस्तावित मार्गावरील बांधकामे आणि अतिक्रमणांची माहिती या पाहणीत घेण्यात आली. आता रिंगरोडची अंतिम आखणी लवकरच निश्चित केली जाणार आहे.

वाहतुकीची होणारी कोंडी सोडविण्यासाठी शहराभोवती रिंगरोड करण्याचा निर्णय राज्य सरकारने २००७ मध्ये घेतला. मात्र, गेली आठ वर्षे हा रस्ता विविध वादांमुळे कागदावरच होता. त्यानंतर या रस्त्याचे प्राथमिक सर्वेक्षण करण्याचे काम एईकॉम एशिया लिमिटेड या कंपनीला देण्यात आले. या कंपनीने आपला प्राथमिक अहवाल राज्य सरकारला सादरही केला.

दरम्यान, केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत या रिंगरोडच्या कामाला हिरवा कंदील दाखविण्यात आला. त्यामध्ये रिंगरोड फेरसर्वेक्षण करून मार्गाची आखणी करावी आणि त्याचा अहवाल सरकारकडे पाठवावा, असे आदेश देण्यात आले. त्याला एईकॉम कंपनीने दिलेल्या अहवालानुसार रिंगरोड अस्तित्वात येणे शक्य आहे का, याची तपासणी करण्याचा निर्णय पीएमआरडीएने घेतला होता. पीएमआरडीएचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश झगडे यांच्यासह रस्ते विकास महामंडळ आणि कंत्राटदार कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे प्रस्तावित मार्गाची पाहणी केली.

नियोजित रिंगरोडची खेड-शिवापूरपासून वडकीनाला, उरळी कांचन ते केसनंदपर्यंत पाहणी करण्यात आली. आता पुढील आठवड्यात लोणीकंद ते पुणे-मुंबई महामार्ग या प्रस्तावित मार्गाची पाहणी केली जाणार आहे. हा रिंगरोड चार टप्प्यात प्रस्तावित असल्याने त्यानुसार मार्गाची पाहणी करण्यात येणार आहे.

या प्रस्तावित रिंगरोडसाठी किती भूसंपादन करावे लागेल, तसेच या मार्गावर मोठी बांधकामे झाली आहेत का, अतिक्रमण आहे का, रस्ता उंच-सखल आहे का आणि शहरात येणाऱ्या कोणत्या प्रमुख रस्त्यांना हा रिंगरोड जोडला जाईल, याची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आल्याचे झगडे यांनी सांगितले. या संपूर्ण रिंगरोडच्या पाहणीनंतर त्याचा अंतिम प्रस्ताव करण्यात येणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.



### खर्च वाढता वाढता वाढे...

वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी २००७ मध्ये प्रस्तावित केलेल्या रिंगरोडचा सुरुवातीचा खर्च तीन हजार कोटी रुपये होता. या रिंगरोडची आखणी चार वेळा बदलल्याने त्यामध्ये बराच कालावधी गेला. १९१.७३ किलोमीटर लांबीच्या सहा पदरी रस्त्यासाठी आता १२ ते १५ हजार कोटी रुपयांवर जाण्याची शक्यता आहे. रिंगरोडसाठी प्रत्यक्ष १५१ किलोमीटरचे रस्ते करावे लागणार आहेत. त्यात १२ किलोमीटर लांबीचे बोगदे व ७.५ किलोमीटर लांबीचे इलेव्हेटेड रस्ते प्रस्तावित असल्याचे सांगितले.

### प्रस्तावित मार्ग

- वाघोली - केसनंद - लोणीकंद मार्ग
- मांजरी बुद्रुक - लोणी काळभोर
- खेड - शिवापूर - दिवे
- वडकीनाला - येवलेवाडी
- भूगाव - नांदे - चांदे
- पिरंगुट - घोटावडे - उरवडे
- वडगाव - उर्से - बेबडओहोळ
- वासुली - सुदुंबरे - देहू - खालुंब्रे
- चऱ्होली - चाकण

### दृष्टिक्षेप...

- १७० किमीचा प्रस्तावित मार्ग
- ९० मीटर रुंद रस्ता
- शहराच्या हद्दीच्या दहा किलोमीटरपासून लांब
- १२ ते १५ हजार कोटी रुपये खर्च

# रिंगरोडच्या अंतिम मार्गासाठी पाहणी

पुणे, ता. २२ : पुणे, पिंपरी-चिंचवडच्या दृष्टीने महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या प्रस्तावित रिंगरोड मार्गाची पाहणी पीएमआरडीएच्या वतीने गुरुवारी करण्यात आली. या रस्त्यासाठी किती क्षेत्राचे भूसंपादन करावे लागणार आहे, प्रस्तावित मार्गावर काही बांधकामे आहेत का, अतिक्रमण झाले आहे का, आदींची माहिती या वेळी घेण्यात आली. त्यामुळे लवकरच या प्रस्तावित रस्त्याचा अंतिम मार्ग निश्चित करण्यात येणार आहे.

गेल्या महिन्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत या मार्गास मान्यता देण्यात आली. त्यामध्ये पुन्हा सर्वेक्षण करून मार्गाची आखणी करावी आणि त्याचा अहवाल सरकारकडे पाठवावा, असे आदेश गडकरी यांनी दिले होते. एका अमेरिकन कंपनीकडून प्रस्तावित रिंगरोडचा मार्ग निश्चित केला आहे. सदर कंपनीने केलेला मार्ग अस्तित्वात येणे शक्य आहे का, याची तपासणी करण्याचा निर्णय पीएमआरडीएने घेतला होता.

त्यानुसार पीएमआरडीएचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश झगडे यांच्यासह एमएसआरडीसी आणि कंत्राटदार कंपनीचे कर्मचारी यांनी एकत्रितरीत्या प्रस्तावित मार्गाची पाहणी केली. खेड-शिवापूर येथून वडकीनाका, उरळी कांचन- केसनंदपर्यंत प्रस्तावित रस्त्याची पाहणी करण्यात आली. पुढील आठवड्यात लोणीकंद ते पुणे- मुंबई महामार्ग या प्रस्तावित मार्गाची पाहणी करण्यात येणार आहे. या संदर्भात झगडे म्हणाले, "प्रस्तावित रस्त्यासाठी किती भूसंपादन करावे लागणार आहे; तसेच या मार्गावर बांधकामे झाली आहेत का, अतिक्रमण आहे का, रस्ता उंच-सखल आहे का, शहरात येणाऱ्या पाचही प्रमुख रस्त्यांना हा कसा जोडता येईल याची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली आहे. पुढील आठवड्यात केसनंदपासून पुणे-मुंबई महामार्गास हा रस्ता कसा जोडणार आहे, याची पाहणी करण्यात येणार आहे. त्यानंतर रस्त्याचा अंतिम प्रस्ताव करण्यात येणार आहे."

## भविष्यातील रुंदीकरणाचाही विचार

प्रस्तावित रिंगरोड हा आठ पदरी करण्याचे नियोजन आहे. त्याशिवाय दोन्ही बाजूस सर्व्हिस रस्ते असणार आहेत. भविष्यात रस्त्यांचे रुंदीकरण करता यावे, याबाबतदेखील त्यामध्ये विचार करण्यात येणार आहे. रस्त्यासाठी लागणारी जागा कशा पद्धतीने ताब्यात घेता येईल, याबाबतदेखील नियोजन रस्त्यांची आखणी पूर्ण झाल्यानंतर करण्यात येणार आहे.